मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी झालेल्या

अधिसभेच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त

## Minutes of the Annual Meeting of the Senate

## held on 16th March, 2017

मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी झालेल्या

अधिसभेच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त.

Minutes of the Annual Meeting of the Senate

held on 16th March, 2017.

# मुंबई विद्यापीठ

मसुदा

क्र. १-२०१६-२०१७

अधिसभा

१६ मार्च, २०१७

अधिसभेची वार्षिक सभा विद्यापीठाच्या सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन येथे गुरूवार दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली सभेमध्ये खालील सदस्य उपस्थित होते :- .

१. डॉ. संजय व्ही. देशमुख (कुलगुरू) अध्यक्ष

२. डॉ.सुनिल पाटील

३. श्री. भुजंग कि. अहिरे

४. डॉ. दिलीप एस. पाटील

५. श्रीमती हुस्नबानू नि. खलिफे

६. ॲड. अनिल परब

७. डॉ. अनिल कर्णिक

८. डॉ. पी. एम. डोंगरे

९. डॉ. मंजिरी कामत

१०. श्री. मच्छिंद्रनाथ र. डोईफोडे

११. श्री. ए. एस. एस. सुंदरम

१२. श्री. दिपक वसावे

१३. श्री. अशोक फळणीकर

१४. डॉ. एम. ए. खान (सदस्य सचिव)

सभेची सुरूवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

अधिसभेच्या कामकाजाला सुरवात करताना कुलसचिवांनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

अभिनंदन :-

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम २५(२) (थ)अ नुसार विधान परिषदेचे सदस्य, ॲड. अनिल परब यांची नेमणुक अधिसभेवर झाल्याबददल विद्यापीठ प्रशासनातर्फे व अधिसभेतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच नविन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये श्री. दिपक वसावे, स्थानापन्न संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व श्री. अशोक फळणीकर, वित्त व लेखा अधिकारी यांची अधिसभेवर पदसिद्ध अधिकारी म्हणून नविन नियमाच्या तरतुदीनुसार नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

मा. कुलगुरू यांना राम मनोहर लोहीया अवध विद्यापीठ, फैजाबाद, येथून मानद डॉ. ऑफ सायन्स ही सर्वोच्च पदवी मिळाल्याबदल अधिसभेतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

डॉ. अनिल कर्णिक यांनी स्वत:तर्फे व सर्व अधिसभेच्या सदस्यांतर्फे कुलगुरूंचे अभिनंदन केले.

मुंबई विद्यापीठामध्ये पदभार स्विकारल्यापासून गेल्या १९ महिन्यामध्ये जी भरीव कामगिरी सर्वांच्या मागदर्शनाखाली करू शकलो, त्याची परिणीती म्हणून हा मान त्यांना मिळाला आहे, असे म्हणून मा. कुलगुरूंनी सर्वांच्या आर्शिवादांनी हा सन्मान विद्यापीठाला अर्पण केला.

ॲड. अनिल परब यांना सभेची जागा बदली झाली याबदल माहिती मिळाली नाही त्यामुळे ते कलिना येथे जाऊन इथे आले त्याबदल मा. कुलगुरूंनी दिलगीरी व्यक्त केली.

अनुपस्थिती :-

डॉ. सुभाष महाजन, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, श्री. धंनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय व सचिव, उच्च व तंत्र विभाग यांनी त्यांची अनुपस्थिती कळविलेली आहे. ती त्यांची विनंती मान्य करण्यात आली.

त्यानंतर कुलसचिवांनी अलिकडच्या काळातील मान्यवर व्यक्तींच्या दु:खद निधनाबददल शोक व्यक्त करून पुढील शब्दात श्रंध्दाजली वाहिली.

**पंडित बबनराव हळदणकर**

ज्येष्ठ गायक आणि बंदिशकार पंडित बबनराव हळदणकर यांचे वृध्दपकाळाने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षाचे होते.

**डॉ. एम. बालमुरलीकृष्ण**

कर्नाटक संगीतातील त्यागराज परंपरेतील प्रख्यात कलावंत डॉ. एम. बालमुरलीकृष्ण यांचे वृध्दपकाळाने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षाचे होते.

**श्री. दिलीप पाडगावकर**

ज्येष्ठ पत्रकार आणि ख्यातनाम विचारवंत श्री. दिलीप पाडगावकर यांचे ह्यविकाराच्या झटक्याने दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षाचे होते.

## डॉ. आनंद यादव

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांचे वृध्दपकाळाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षाचे होते.

## श्री. लक्ष्मण ऊर्फ दादा पांडे

ज्येष्ठ साहित्यिक श्री लक्ष्मण ऊर्फ दादा पांडे यांचे वृध्दपकाळाने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षाचे होते.

## श्री. श्रीराम गोजमगुंडे

ज्येष्ठ रंगकर्मी तथा सिने अभिनेते, दिग्दर्शक श्री. श्रीराम गोजमगुंडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षाचे होते.

## डॉ. सुलभा ब्रह्मे

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुलभा ब्रह्मे यांचे दिर्घ आजाराने दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८५ वर्षाच्या होत्या.

## मुख्यमंत्री जे. जयललिता

तामिळनाडु राज्यातील मुख्यमंत्री जे. जयललिता यांचे दिर्घ आजाराने दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६७ वर्षाच्या होत्या.

## चो. रामस्वामी

ज्येष्ठ सपांदक चो. रामस्वामी यांचे काही दिवसाच्या आजाराने दिनांक ७ डिसेंबर. २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षाचे होते.

## डॉ. रमेश प्रभू

मुंबईचे माजी महापौर डॉ. रमेश प्रभू यांचे वृध्दपकाळाने दिनांक ११ डिसेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षाचे होते.

## प्रा. विजय जामसंडेकर

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत शिक्षणतज्ज्ञ आणि समुपदेशक प्रा. विजय जामसंडेकर यांचे ह्यविकाराच्या झटक्याने दिनांक १२ डिसेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५६ वर्षाचे होते.

## श्री. एस. आर. कुलकर्णी

गोदी कामगारांचे ज्येष्ठ नेते श्री. एस.आर. कुलकर्णी यांचे वृध्दपकाळाने दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षाचे होते.

### श्री. वसंत सरवटे

ज्येष्ठ व्यंगचित्रकार श्री. वसंत सरवटे यांचे वृध्दपकाळाने दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

### श्री. बापू लिमये

मराठी रंगभूमीवरील प्रयोगशील ज्येष्ठ नेपथ्यकार श्री. बापू लिमये यांचे वृध्दपकाळाने दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९१ वर्षांचे होते.

### श्री. बाळासाहेब विखे पाटील

कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री. बाळासाहेब विखे पाटील यांचे दिर्घ आजाराने दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

### डॉ. ज्योत्स्ना कार्येकर

ज्येष्ठ अभिनेत्री डॉ. ज्योत्स्ना कार्येकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षांच्या होत्या.

### श्री. बी.आर.मढवी

डोंबिवलीतील मुंबई विद्यापीठाचे केंद्र म्हणून बाहेरून पदवी परीक्षा देण्यासाठी मान्यता पावलेले श्री. बी. आर. मढवी यांचे दिर्घ आजाराने दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

### अभिनेता ओम पुरी

ज्येष्ठ अभिनेता ओम पुरी यांचे ह्यविकाराच्या झटक्याने दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६६ वर्षांचे होते.

### श्रीमती. निर्मला आठवले

स्वाध्याय परिवाराचे प्रणेते पद्मविभूषण आणि रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या पत्नी निर्मलाताई आठवले यांचे वृध्दपकाळाने दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९० वर्षांच्या होत्या.

### श्री. जांबुवंतराव धोटे

स्वतंत्र विदर्भाचे पुरस्कर्ते ज्येष्ठ नेते विदर्भसिंह श्री.जांबुवंतराव धोटे यांचे ह्यविकाराच्या झटक्याने दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

### श्री. तारक मेहता

श्री. तारक मेहता का उलटा चश्मा या प्रसिद्ध विनोदी मालिकेचे लेखक श्री. तारक मेहता यांचे प्रदिर्घ आजाराने दिनांक ०१ मार्च, २०१७ रोजी निधन झाले मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते.

**डॉ.विश्वनाथ देशपांडे**

जेष्ठ नाटयसमीक्षक, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी कार्यअध्यक्ष आणि देशातील 'नाटयकोशा'चे संपादक डॉ. विश्वनाथ देशपांडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०९ मार्च, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते.

यानंतर अधिसभा सदस्यांनी वरील मान्यवरांच्या तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या दु:खद निधनाबद्दल एक मिनीट उभे राहून श्रंध्दाजली अर्पण केली.

कुलसचिवांनी सभागृहास अवगत केले की, श्री. स्वामीनाथन यांना डी.लीट ही पदवी देण्यासाठी अधिसभेने याआधी दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी बाब क्र.४ अन्वये केलेला ठरावामध्ये दुरूस्ती आवश्यक असल्यामुळे कुलसचिवांनी त्याबाबत सविस्तर माहिती सांगण्याची विनंती मा. कुलगुरूना केली.

मा. कुलगुरूंनी आपल्या विद्यापीठाच्या १६० वर्षाच्या उज्वल भुतकाळामध्ये आजवर ३२ मान्यवरांना विद्यापीठांनी अशा प्रकारच्या मानद् पदवीने सन्मानित केलेले आहे. ज्यावेळी ही पदवी देण्यासंदर्भात प्रस्ताव मांडायचे ठरवले तेव्हा राज्यपालांची पुर्व परवानगी घेऊन, त्यांनतर डॉ. स्वामीनाथण सरांना त्याची कल्पना देऊन आपल्या विद्यापीठाच्या वेगवेगळया प्राधिकराणामधून हा ठराव पारित करून घेतला होता.

या प्रक्रियेमध्ये एक विशिष्ट पुस्तक छापावे असे माझ्या मनात अनेक दिवस होते; जेणेकरून ३२ महान व्यक्तिंचा परिचय ज्याला आपण लाईफ स्केच म्हणतो, २-३ पानांमध्ये होईल, त्यांना दिली गेलेली ही एक मानद् पदवी च्या सदंर्भातील दस्तऐवज शोधत असताना असे लक्षात आले की, आपल्या मुंबई विद्यापीठातर्फे 'डि.लीट.' ही जी पदवी आहे ती रिसर्च वर्क सबमिट केल्यानंतर दिली जाते. इतर विद्यापीठात डि.लीट. ही मानद् स्वरूपात दिली जाते; परंतु आपल्या विद्यापीठामध्ये आजवर गेल्या १६० वर्षामध्ये ज्या ३२ जणांना आपण पदवी दिली त्याला एल.एल.डी. असे म्हणतात. डॉक्टर आफॅ लॉज आणि एल.एल.डी. पदवीचे वैशिष्ट असे आहे की, ती कुठल्याही विशिष्ठ शाखेची नाही, म्हणजे एखादी व्यक्तिी कला शाखेची असेल तर आपण त्याला डी.लीट. म्हणत असू. परंतु एल.एल.डी. म्हटल्यानंतर ती व्यक्ती कोणत्याही शाखेची असेल त्याला एल.एल.डी. हे नामकरण लागू होते. उदा. आपल्याकडे सर सी.व्ही रामण विज्ञान शाखेचे होते, बाबा काणे कला शाखेचचे होते आणि आता अलिकडेच १४ वर्षापूर्वी ज्यांना मानद् एल.एल.डी. पदवी दिली ते अमर्त्य सेन हे वाणिज्य शाखेचे होते, अशा प्रकारे कोणत्याही शाखेची व्यक्ती असेल तर एल.एल.डी. पदवी ही युनिर्व्हसल असल्यामुळे देता येते. आपल्या मुंबई विद्यापीठाच्या वैशिष्ठपुर्ण व ऐतिहासिक अशा गोष्टींचा शोध घेत असताना हे लक्षात आले म्हणून पुन्हा सगळया प्राधिकरणांकडे जाऊन ठराव केला की, त्यांना डी.लीट. च्या ऐवजी एल. एल.डी. म्हणायला हवे व तशा प्रकारची सुधारणा आपण जी पदवी छापतो आहोत त्याच्यामध्ये केलेली आहे. व्यवस्थापन परिषद आणि विद्वत परिषदेने सुध्दा हा ठराव पारित केलेला आहे. मुंबई विद्यापीठातील सर्वोच्च प्राधिकरण अधिसभा असल्याने अधिसभेने ही परवानगी दयावी, अशी विनंती मा. कुलगुरूंनी केली.

व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १४ मार्च, २०१७ रोजी बाब क्र. ७५ च्या खालील ठरावास मंजूरी देण्यात आली.

बाब ७५: Proposal for changing nomenclature of Hon. DLitt to Hon. LLD with respect to the decision of the Senate, A.C. and th M.C. in their meetings dated March 28th, 2016, March 11th 2016 and March 11th 2016 respectively, to confer the same upon Dr. M. S. Swaminathan be accepted.

Resolution: It is **resolved** that, Proposal for changing nomenclature of Hon. DLitt to Hon. LLD with respect to the decision of the Senate, A.C. and th M.C. in their meetings dated March 28th, 2016, March 11th 2016 and March 11th 2016 respectively, to confer the same upon Dr. M. S. Swaminathan **is accepted.**

**बाब क्र १: दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संमत करणे.**

दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभासदांनी सुचविलेल्या किरकोळ दुरूस्ती करून यानंतर होणा-या अधिसभेच्या बैठकीत ठेवण्यात येतील, असे कुलगुरूंनी सांगितले.

**बाब क्र २: प्रश्नोत्तरांचा तास.**

सन्माननीय सभासदांकडून दिनांक १३ फेब्रुवारी, २०१७ पर्यंत प्रश्नोत्तरांच्या तासाकरीता प्रश्न मागविण्यात आले होते. परंतू या मुदतीत एकही प्रश्न प्राप्त झाला नाही.

**बाब क्र३: मुंबई विद्यापीठाचे २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी विद्यापीठाचा अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०१६- २०१७ वर्षाकरिता सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज.**

(१) व्यवस्थापन परिषदेने सादर केलेल्या वार्षिक वित्तिय विवरणाचा (ज्यात २०१७-२०१८ या वर्षाचा अर्थसंकल्पिय अंदाज तसेच २०१६-२०१७ सालासाठीचा सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज यांचा समावेश आहे.) विचार अधिसभेने करावा.

(२) वार्षिक वित्तिय विवरणामध्ये तपशीलवार दिलेले २०१७-२०१८ सालासाठीचे अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०१६-२०१७ सालासाठीचे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज विचारात घेऊन स्विकृत आणि संमत करावे.

सदर अर्थसंकल्पीय अदांजाच्या प्रस्तावास मा. कुलगुरू यांनी व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार अधिसभेच्या विचारार्थ व मंजुरीसाठी शिफारस केली. मा. कुलगुरू यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पास डॉ. अनिल कर्णिक यांनी अनुमोदन दिले.

अर्थसंकल्पीय अंदाज व्यवस्थित तयार केल्यामुळे मा. कुलगुरूंनी वित्त व लेखा अधिकारी यांचे आभार मानले.

अर्थसंकल्पाच्या अनुषगांने ज्या तरतुदी केलेल्या आहेत आणि गेल्या वर्षीचा जो अर्थसंकल्पाचा प्रस्ताव होता प्रथमच आपल्या विद्यापीठाच्या अनेक वर्षाच्या इतिहासामध्ये आपण जे अर्थसंकल्प प्रस्तावित केले ते सरप्लस म्हणून प्रस्तावित केल होते. ते साधारणपणे ६४ कोटी एवढे प्रस्तावित केले होते, याच्यामध्ये दोन गोष्टी अश्या होत्या की आपल्याला अपेक्षित रक्कम कमीट केली गेली तर त्याचा उल्लेख बजेटच्या लेखाजोख्या मध्ये करता येत नाही. परंतु ती रक्कम येणार आहे, अशा पध्दतीने त्या टिप्पणी मध्ये त्याचा उल्लेख करू शकतो; जी रक्कम गेल्या वर्षी अपेक्षित होती. विशेषत: शासनाकडुन साधारणपणे २२७ कोटी रूपये जो शिक्षकांना पगार १० ते १२ वर्षामध्ये दिला आहे त्याचा पाठपुरावा करत आहोत. पण त्यातली कमीत-कमी १०० कोटी मिळणे अपेक्षित होते. परंतु ते मिळू शकले नाही म्हणून त्याच्यामधली ६३ कोटीची सरप्लस दाखविली होती व ती त्या प्रमाणामध्ये मिळू शकलेली नाही.

त्याचबरोबर सलंग्न महाविद्यालयांकडून सलंग्नता शुल्क गेल्या २५ वर्षामध्ये अनेक कॉलेजकडून जमा झालेली नाही आणि ती रक्कम साधारणपणे ८० कोटीच्या घरात आहे. तो पाठपुरावा करत आहोत. त्यासाठी एक एजन्सी नेमलेली आहे. आपल्याकडे आता आकडे आहेत, गेल्यावर्षी ती रक्कम ठराविक मुदतीत मिळू न शकल्यामुळे जे बजेट ६३ कोटीचे सरप्लस होते ते या वर्षी जो खरा लेखाजोखा मांडला त्याच्यामध्ये ती तुट ७३ कोटी आहे. परंतु ही रक्कम मिळणार आहे. त्या अनुषगांने अर्थसंकल्पिय अंदाज २०१७-१८ त्यातील ठळक मुद्दे आपल्या समोर मांडतो आणि प्रस्ताव ठेवतो.

या वर्षाचा अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये २०१६-१७ चा मुळ अर्थसंकल्प सुमारे ६०,७१४ लक्ष असा होता; परंतु जेव्हा सुधारित अर्थसंकल्प तयार केला तेव्हा तो ३७ हजार ७५ पूर्णांक ५४ शंताश लक्ष असा दिसतो. त्यामुळे मुळ अर्थसंकल्पामध्ये सुमारे २३,६३८ पुर्णांक ५५ शंताश लक्षांनी कपात दिसुन येते. त्यामुळे एकुण सुधारित अर्थसंकल्पामधील तुट जेव्हा पाहिली ती ७,३२८ पूर्णांक ५७ लक्ष ऐवढी दिसुन येते. मुळ अर्थसंकल्पामधील अधिक्य ज्याला आपण सरप्लस म्हणतो, ते सुमारे ६१,७७,०९,०००/- आहे.

२०१७-१८ अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक आहे, त्याच्यामध्ये एकुण आवर्ती व अनावर्ती हा एकुण ४८,६१० पुर्णांक ३५ शंताश लक्ष ऐवढा वर्क आउट केलेला आहे. त्यामधील एकुण आवर्ती व अनावर्ती जमा ही ५३,९०४ पुर्णांक ४८ लक्ष एवढी असणार आहे. त्यामधील आवर्ती जमा हे ५१,४९९ पुर्णांक ९६ लक्ष असेल आणि आवर्ती खर्च ३५,१६१ पुर्णांक १८ शंताश लक्ष ऐवढा असणार आहे. अशा पध्दतीने रिकरिंग मधील जे अधिक्य आहे ज्याला सरप्लस म्हणतो ते सुमारे १६,३३८ पुर्णांक ७८ शंताश लक्ष असेल आणि अनावर्ती उत्पन्न ज्याला नॉन रिंकरिंग उत्पन्न म्हणतो ते सुमारे रूपये २,४०४ पुर्णांक ५२ शंताश लक्ष ऐवढे असेल. त्यात अनावर्ती खर्च हे रूपये १३,४४९ पुर्णांक १७ शंताश लक्ष असेल. त्यामुळे आता आपल्याला दिसणारी अनावर्ती तूट या बजेट प्रमाणे ११,०४४ पुर्णांक ६५ शंताश लक्ष एवढी असेल. तथापी एकुण सरप्लस त्याच्यामध्ये शासनाकडून २२७ पैकी कमीत-कमी त्यांनी यावर्षी शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये त्याचा

उल्लेख केला असेलच. त्यानुसार १०० कोटी आपल्याला मिळाले आणि आपल्या संलग्नीत महाविद्यालयाची रक्कम ८० कोटीच्या घरात मिळणार आहे. ती जर मिळाली तर एकुण अधिक्य ५२,०५,२९४ पुर्णांक १३ शंताश लक्ष ऐवढे असेल. अशा पध्दतीने ५२ कोटीची सरप्लस असलेल्या रक्कमेला या वर्षी ख-या अर्थाने नक्की न्याय देता येईल असा विश्वास व्यक्त केला.

विद्यापीठाचे गंगाजळ हे आपल्या बजेट पेक्षा कमी आहे आणि १६० वर्षे वयाच्या विद्यापीठाला हे नक्कीच फार असे आश्वासक चित्र नाही. त्यामुळे विद्यापीठाच्या अर्थसंकल्पामध्ये ज्या काही आकडयाची गोळा-बेरीज करतो त्या व्यतिरिक्त विद्यापीठाला अतिशय सक्षम करण्यासाठी आणि भक्कमपणे आर्थिकदृष्टया आपल्या पायावर उभे करण्यासाठी गेल्या वर्षीपासून विविध प्रयत्न करायला सुरवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून एम.एम.आर.डी.ए. बरोबर एक करार केला की, ज्याच्यामध्ये एक परिघीय क्षेत्राचा वापर करून विद्यापीठाची एकही फुट जमिन न वापरता तिकडे एक फ्लाय ओव्हर कंपाउडवॉलला लागून जाणार आहे आणि त्याच्यामधून हवाई ४५ फुट नंतर फ्लाय ओव्हरच्या वरच्या बाजूनी कव्हर होणार आहे तो परिघीय क्षेत्र वापरासाठी शासनाने टी.डी.आर. देऊ केलेला आहे. त्या टी.डी.आर.ची साधारणपणे विकल्यानंतरची अंदाजे रक्कम ३५० कोटी एवढी आपण उभी करू शकतो.

जमनालाल बजाज जो विद्यापीठाचा विभाग आहे त्याच्या स्वायत्तेनंतर जे व्यवस्थापन मंडळ तयार केले त्यामध्ये जमनालाल बजाज मधील चार माजी विद्यार्थी अतिशय प्रतिष्ठित व्यक्ती मानले जातात व निरज बजाज, जमनालाल बजाज यांचा नातू अशा पाच जणांची आपण शिफारस देऊन निवड केली त्यापैकी श्री. अजय पिरामल, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष असतील त्यानंतर नौशिर काका, ग्लोबल हेड मॅकनिझम आणि चंदा कोचर व उदय कोटक आणि निरज बजाज अशा ५ जणांची व्यवस्थापन मंडळावर आपण नियुक्ती केल्यानंतर या समितीने त्यांच्या प्रथम बैठकीमध्ये असे आश्वासन दिले की, मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरामधील अडीच एकर जमीन आपण त्यांच्यासाठी नियोजित केलेली आहे त्यावरील बांधकामाचा होणारा १४० कोटी खर्च या व्यवस्थापन मंडळाच्या व्यक्तिंच्या सी.एस.आर. च्या कार्यामधून उभा केला जाईल. अशा पद्धतीने आपल्याला १४० कोटी रूपयांचे अप्रत्यक्षपणे अनुदान मिळाल्यासारखे आहे.

इंडियन एअर फोर्सच्या मदतीने आपण ६० कोटी रूपयांची वास्तू बांधत आहोत त्याच्यामध्ये 'लिडरशिप सायन्स' हा जो अभ्यासक्रम या वर्षी सुरू केला आहे. त्याच्यासाठी लिडरशिप ॲकडमीच्या विकासासाठी बिल्डींगचा सर्व खर्च एअर फोर्स देणार आहे. ती बिल्डींग ते बांधून देतील अशा पध्दतीचे औपचारिक बोलणे व आश्वासन एअर फोर्स कडून झालेले आहे, त्यांच्या विंग कमांडर बरोबर प्रत्यक्ष चर्चा झाली; त्यांच्या वरिष्ठा बरोबर चर्चा करून हा निर्णय कळवलेला आहे. अशा पध्दतीने एम.एम.आर.डी.ए. बरोबर केलेल्या करारानुसार मिळणारी रक्कम आणि १४०+६०=२०० साधारणपणे ४०० कोटीची रक्कम आपल्याला मिळते आहे, असे लक्षात आल्यानंतर विद्यापीठाचा विद्यानगरी मधील २५० एकर परिसर आहे त्याचा एक मास्टर प्लॉन तयार करू अशी कल्पना पुढे आली. आपल्या प्राधिकरणाच्या परवानगीने त्याच्यावर प्राथमिक स्वरूपाचे काम आपण सुरू केले. इकडे जो एफ.एस.आय. आहे तो ग्राऊंड +५ + १०+

१५ एवढा मिळू शकतो. कारण सर्व इमारती ग्राऊंड +३ पेक्षा जास्त नाही आहेत आणि त्या मुळे विद्यानगरी परिसरातला १७ लाख स्वेअर फुट बांधकाम असलेला जो परिसर आहे त्याचे बांधकाम १० पटीने वाढवून आपण साधारणपणे १ क़ोटी २० लक्ष स्केअर फुट एवढे करायचे प्रस्तावित करत आहोत आणि एवढे करत असताना सुद्धा विद्यानगरी परिसरामध्ये ५० टक्के जमिन जी आजच्या बांधकामाने व्यापलेली आहे, ती नविन १० पट जास्त बांधकाम करून सुद्धा केवळ ३३ टक्के जमिन व्यापणार आहे आणि ६७ टक्के जमिन ग्रीन झोन आणि ओपन स्पेस मध्ये उपलब्ध करणार आहोत. अशा पद्धतीने विकसीत होणारा ही देशातली पहिलीच योजना असेल, त्याच्यामध्ये विद्यापीठ १६० वर्षानंतर एका नवीन रूपाने जगापुढे ऐवू इच्छितो, यासाठी प्रस्तावित खर्च ३ हजार कोटीचा आहे त्याच्यामध्ये ५५० कोटी आपण उभे केल्यासारखे असल्यामुळे बाकीच्या रकमेची उभारणी करण्यासाठी आपण आपल्या माजी विद्यार्थ्यांना आणि मुंबई विद्यापीठाचे जे शुभेच्छुक, हितचिंतक आहेत त्याच्या नावाने 'फ्रेंडस ऑफ मुंबई विद्यापीठ' असे व्यासपीठ स्थापण करत आहोत. सेक्शन ८ कंपनी म्हणून ज्याचे उत्तरदायित्व राज्यपाल, मुख्यमंत्री महोदय, आपले आदरणीय मंत्री विशेषत: एज्युकेशन विभागाचे आणि रतन टाटा सर, डॉ. मुकेश अंबानी जे ट्रस्टी असतील त्याच्या मदतीने आपण ही दाननिधी आपण उभी करू शकतो. एक वर्षा मध्ये आमच लक्ष साधारणपणे १ कोटी रूपयाचे आहे. अशा पध्दतीने आपण दाननिधी निर्माण करू शकु.

आदरणीय पंतप्रधान मोदीजी यांच्या स्वप्नामधल्या या २१ व्या शतकातील भारताची एक महत्वाची साखळी म्हणजे शिक्षण. त्यामुळे त्यांनी १० विद्यापीठांना ओळख दयायचे ठरविलेले आहे. विद्यापीठांना ओळख दिल्यानंतर त्यासाठी एक विशेष रक्कम देण्यात येणार असून त्यायोगे या विद्यापीठांचा विकास जागतिक दर्जाच्या विद्यापीठांप्रमाणे होईल. अशा पध्दतीने ते काम भारत सरकार करणार आहे. त्या १० विद्यापीठांच्या यादीमध्ये यावे अशी माझी मनापासूनची इच्छा आहे; त्या दृष्टीने आपण प्रयत्न करत आहोत. तसा प्रस्ताव आपण तयार करत आहोत आणि या महिन्यामध्ये तो आपण केंद्र शासनाला आपण पाठवू आणि तसे जर झाले त्या १० जणांच्या यादीमध्ये जर आपण आलो तर त्यासाठी आपल्याला केंद्र शासनाकडुन ५०० कोटींची अधिक रक्कम रिसर्च आणि डेव्हलपमेंटसाठी मिळू शकेल असा मला विश्वास वाटतो. त्यामुळे अशा वेगवेगळया योजना, आर्थिक तरतुदी केल्यानंतर आपण साकारायला आणत आहोत. ही जी आपली बृहत योजना (Master Plan) आहे त्याचे साधारणपणे दिड महिन्यामध्ये प्राथमिक सादरीकरण मंत्री महोदयांना करणार आहोत. ही योजना आपल्या सर्वांशी शेअर करून नंतरच शासनाकडे जाऊ, जेणेकरून त्याची मान्यता मिळाल्यानंतर सविस्तर नियोजन आपल्याला सुरू करता येईल आणि ५५० कोटी मधून आपण सुरवातीच बांधकाम करायला सुरूवात करू शकतो.

अशा पध्दतीने विद्यापीठाचा या वर्षीचा नविन अर्थसंकल्प मांडत असताना गेल्या १९ महिन्यातल्या या खुप जमेच्या बाजू आहेत आणि त्यासाठी आपणा सर्वांचे मनपूर्वक आभार मानू इच्छितो. त्याचबरोबर विद्यापीठाच्या या वर्षीच्या नविन योजना प्रस्तावित आहेत. कारण गेल्या वर्षी अनेक नविन योजना मांडल्या होत्या, त्यापैकी साधारणपणे २५% योजनाना सुदैवाने आपणाला बाहेरून निधीची वचनबध्दता झाल्यामुळे साधारणपणे ६ ते ७ कोटी रूपये आपण योजनांसाठी प्रस्तावित केले होते ते आपल्याला आता खर्च करावे लागणार नाहीत; त्याच्यामध्ये

एक आईस सेंटरसाठी १ कोटी ८० लाख रूपये टाटा फाऊंडेशन ट्रस्टने आपल्याला आश्वासीत केलेले आहे; त्यानंतर ज्याला आपण वेंट लॅन्ड म्हणतो ते एक तलावाची निर्मिती करतो आहोत त्यासाठी एक कोटी प्रस्तावित होते; त्यासाठी आता टाटा ट्रस्ट निधी देत आहे.

राजाभाई टॉवरच्या व्यतिरिक्त ४० आभासी ग्रंथालयाचा प्रस्ताव पाठवितो आहोत. त्यासाठी १ कोटी ८० लाख रूपयाची जी तरतुद आभासी वर्गासाठी केली होती ती आता आभासी ग्रंथालयासाठी टाटा ट्रॅस्ट ने ही रक्कम आश्वासित केलेली आहे. तर अशा पद्धतीने अनेक नवीन योजना, कुलगुरूंच्या म्हणून प्रस्तावित केल्या; त्या पैकी काही योजनांना अशा प्रकारच्या ट्रस्टनी स्वत:हून पुढे येऊन सहकार्य करण्याची तयारी दाखवल्यामुळे आपण या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये साधारणपणे ६ ते ७ कोटी रूपये वाचवू शकलेलो आहोत.

नवीन उपक्रम जे या वर्षी आपण प्रस्तावीत करतो आहोत; त्यामध्ये शासनाकडे पालघर जिल्हयामध्ये रिव्हेन्यु डिर्पाटमेंटनी जी १२०० एकरची जमीन प्रस्तावीत केलेली आहे किंवा हस्तांतरण केलेली आहे. प्रशासनाला त्यातली २०० एकर जमीन शासनाला मागितलेली आहे. कारण तिकडे 'एज्युकेशन हब' होणे खुप आवश्यक आहे. शासनाचे ७३ विभाग तिकडे स्थापन होणार आहेत. म्हणजे प्रशासकीय इमारती पासून वेगवेगळया डिर्पाटमेंटची स्थापना होणार आहे. पण 'एज्युकेशन हब' त्या भूभागात नसल्यामुळे त्यासाठी २०० एकर जमीन शासनाने दयावी, असे प्रस्तावीत केले आहे. त्याच्यामध्ये आपण पालघर आणि ठाणे जिल्हयामधला ७० टक्के भाग जो आदिवासी लोकांचा आहे, भौगोलिकरित्या, त्यांच्यासाठी आपण एक 'सेंटर ऑफ एक्सलेन्स इन ट्रॅव्हल डेव्हलपमेंट' असे आपण प्रस्तावीत करत आहोत. त्याचबरोबर कळव्याला १४ एकर जमीन शासनाकडून मिळते आहे. त्यासाठी ' सेंटर ऑफ एक्सलन्स इन स्किल डेव्हल्पमेंट फॉर वुमन' असा १०० कोटींचा प्रस्ताव शासनाकडे दिलेला आहे. त्याचबरोबर केंद्र शासनाकडे आपण १६० कोटींचा प्रस्ताव दिलेला आहे. त्याच्यामध्ये डिझाईन स्कुलची निर्मिती करावी, असे प्रस्तावीत केल आहे आणि ते १६० कोटी रूपये ज्यापद्धतीने २००७ मध्ये १५० कोटी रूपये शासनाने दिले होते; १५० वर्षे पुर्ण झाली म्हणून, तर या वर्षी १६० वर्ष पुर्ण होत आहेत म्हणून या वर्षी १६० कोटी रूपयांचा प्रस्ताव दिलेला आहे. तर त्याचा उल्लेख राज्य शासनाने या वर्षीच्या बजेटमध्ये करावा अशी आपण त्यांना विनंती केली आहे.

नॅनो सायन्स आणि नॅनो टेक्नोलॉजीसाठी १०० कोटी २००७ साली जे मिळाले होते. त्यातून या सेंटरची निर्मिती केली खरी परंतु त्याच्या आवर्ती खर्चासाठी त्याच्यामध्ये तरतुद नसल्यामुळे शासनाने तयारी दाखवलेली आहे की, या सेंटरसाठी असणा-या ५५ लोकांचा स्टाफ त्यांचा पगार शासन कायमस्वरूपी अनुदान देऊन त्याची जबाबदारी घेऊ इच्छतो आणि तसा प्रस्ताव शासनाला दिलेला आहे. तर त्यानुसार शासन कदाचित या वर्षी तरतुद करेल, अशी शक्यता आहे.

अर्थशास्त्र विभागला आता 'स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स आणि पब्लिक पॉलिसी' अस नवीन नाव दिलेल आहे. त्यासाठी एक नवीन वास्तु या आपल्या बृहत योजनेमध्ये (Master Plan)

प्रस्तावीत करत आहोत. त्यासाठी लागणारी साधारणपणे १०० कोटी रूपयांची रक्कम त्यापैकी ६० कोटी रूपये शासनाने दयावेत असेही या वर्षी प्रस्तावीत केलेले आहे.

या पाच-सहा गोष्टींचा प्रस्ताव स्वतंत्ररित्या शासनाकडे पाठवलेला आहे. त्यासाठी फक्त जुजबी तरतुद आपल्या अर्थसंकल्पात केलेली आहे. परंतु पुर्णपणे ही रक्कम शासनाकडुन किंवा आपल्या दाननिधीमधुन विकसित करून या पद्धतीने त्याचा विकास करू शकु, असा मला विश्वास वाटतो. तर या वर्षी नवीन योजना ज्याच्याबद्दल मी आता सांगेन तर त्या योजनांमध्ये मास्टर प्लॅन विद्यापीठाचा ज्याच्यासाठी १ कोटी रूपयाची तरतुद केली आहे. आपल्याला ओ.आर. एफ. (ORF) म्हणून जी फांऊडेशन आहे त्यांनी आश्वाशित केल आहे की, अशाप्रकारे डिझाईन कॉम्पीटीशन घेतली तर हा खर्च ते स्वत: खर्च करतील आणि ती रक्कम ते उभी करतील. आपल्याकडुन ही तरतुद करून ठेवलेली आहे.

त्याचप्रमाणे 'झीशांग लिंग सेटर फॉर इंडिया चायना स्टडीज' हे मोदींच स्वप्न आपण साकारायला आणतो, त्या वास्तुची निर्मिती करायला आपण सुरूवात केलेली आहे. राजीव गांधी सेंटरमध्ये त्याचे इंटिरीयर काम झालेले असुन त्याचे औपचारिक उद्‌घाटन या वर्षी करू शकू. त्या मध्ये तरतुद जरी ५० लक्ष कोटी रूपयांची असली तरी यासाठी लागणारा ३ कोटी रूपयांचा खर्च हा ओ.आर.एफ. आणि रिलायन्स फांऊडेशन यांनी एकत्रीतपणे केलेला आहे. त्यामुळे यासाठी आपल्याला आतापर्यंत एकही पैसा खर्च करावा लागलेला नाही.

'सेंटर फोर युरोपियन स्टडीज' म्हणून यावर्षी व्हॅरच्युल सेंटर स्थापन केलेल आहे. त्यासाठी १५ लक्ष रूपयांची तरतुद केलेली आहे. तर अशाप्रकारे काही नवीन योजना मी आपल्या समोर मांडल्या आहेत.

अर्थसंकल्पिय टिप्पणी जी आहे, मघाशी मी तुम्हाला प्रत्यक्षात रक्कम सांगितली पण टिप्पणी मधले फक्त चार मुद्दे आपल्या समोर मांडू इच्छितो. विद्यापीठाचा १६-१७ चा अर्थसंकल्प ७०७ कोटी १४ लक्ष एवढा असून सुधारित अर्थसंकल्प ३७० कोटी ७६ लाख इतका आहे. म्हणजे मुळ अर्थसंकल्पामध्ये साधारणपणे २३६.३८ कोटींची कपात झालेली आहे. सुधारित अर्थसंकल्प १६-१७ मध्ये आवर्ती अधिशेष ३.९७ कोटींचा आहे आणि अनावर्ती तुट सुमारे ७७ कोटी इतकी आहे. म्हणजे सुधारित अर्थसंकल्पामध्ये नेट तुट ७३ पुर्णांक २९ कोटी इतकी दिसून येते. विद्यापीठाचा १७-१८ अर्थसंकल्पाचा अभ्यास केला तर ती ५३९.०४ कोटी इतका असून १७-१८ मध्ये आवर्ती अधिशेष (रिकरिंग सरप्लस) १६३ कोटी पूर्णांक ३९ लाख एवढा आपण दर्शवलेला आहे आणि त्यातली आवक कशापद्धतीने आपल्याला मिळु शकतील आणि याच्यामध्ये माझी विशेष विनंती अनिल परब सरांना राहील की जे आज शासनाचे आणि लोकप्रतिनीधी म्हणून सिनेटवर असल्यामुळे शासनाकडुन देय असलेली ही रक्कम, जी १०० कोटींची आहे आणि महाविद्यालयाकडुन जी रक्कम मिळणारी आहे त्याच्यामध्ये स्वत: लक्ष घालुन आम्हाला मदत करावी, अशी मी त्यांना विनंती करतो.

नॉन रिकरिंग डेफिसिट ११० कोटी पूर्णांक ४५ लक्ष इतका आहे. म्हणजे अर्थसंकल्पामध्ये नेट सरप्लस ५२ पूर्णांक ९४ कोटी एवढा दिसून येतो. त्यामुळे यावर्षी सुद्धा

आपला अर्थसंकल्प ५२ कोटींनी सरप्लस असणार आहे. १७-१८ मध्ये रिकरिंग सरप्लस असून विद्यापीठाने नियोजित केलेले विविध बांधकाम आणि मोठयाप्रमाणामध्ये इमारत दुरूस्तीसाठी भरीव तरतुद केल्यामुळे नॉन रिकरींगमध्ये आपल्याला तूट दिसून येते.

तथापि कामाच्या निमित्ताने आणि शासनाच्या विविध समित्यांमध्ये काम करत असताना असे लक्षात येते की, आपल्या भारतामध्ये ८०० च्या आसपास विद्यापीठे आहेत; पण आपले एकमेव विद्यापीठ असे आहे की जे काहीतरी वेगळया पद्धतीने मार्गक्रमण करू इच्छितो आणि करत आहे. अर्थसंकल्प सरप्लसमध्ये असणं ही खुप मोठी आपली जमेची बाजु आहे. नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अस्तित्वात आला आहे, त्यामधील तरतुदीनुसार परेदशामध्ये कॅम्पस सुरू करू शकतो, अशी तरतुद असल्यामुळे त्या पध्दतीने काम बघण्याकरिता मी अमेरिकेला गेलो होतो आणि तिथे अतिशय उत्साहवर्धक अशी प्रतिक्रिया तेथिल भारतीयांची मिळाली आणि तिथे एका अमेरीकेतील विद्यापीठाने असा प्रस्ताव दिला आहे की, त्यांच्याकडे अस्तित्वात असलेली साधारण एकलक्ष स्क्वेअर फुटची इमारत ते आपल्याला देऊ इच्छितात आणि तीकडे फक्त आपण बाकीचे इंटिरिअरचे काम करून विद्यापीठाची एक नवीन कॅम्पस त्यांच्या विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये सुरू करू शकतो. ओहायोमध्ये अॅक्रॉन नावाचे १४७ वर्ष जुने विद्यापीठ आहे त्यांनी ही ऑफर दिली आहे, त्याचबरोबर टेक्ससमध्ये, हयुस्टनमध्ये काही भारतीयांनी तिकडच्या एखादया छोटयाश्या विद्यापीठाला आपण विकत घेऊ शकलो आणि त्याला मुंबई विद्यापीठ असे नाव देऊ शकलो तर ऑनलाईन या स्वरूपाचे ग्लोबल प्रोग्रॅमचा आपण विकास करू शकू आणि त्यातून आपल्याला दरवर्षी खुप मोठया प्रमाणामध्ये आर्थिक दृष्टया सक्षम होता येईल.

न्युयॉर्कमध्ये आम्ही एक वास्तू पाहिली ज्यासाठी सुमारे १५ मिलिअन डॉर्लस ही रक्कम तिकडचे काही अनिवासी भारतीय देऊ इच्छितात आणि ते म्हणाले की तिथे ग्राऊंड प्लस ट्वेंटीची सोय आहे आणि तिथे आपण बांधकाम करून नवीन-नवीन कोर्सेस सुरू करू शकू. तथापि या सगळया अतिशय अश्वाशित अशा वचनबध्दतेनंतर विद्यापीठ शासनाकडे जाऊ इच्छितो आणि युजीसी आणि एम.एम.आर.डी.ए. यांच्या औपचारिक परवानग्या मिळाल्या नंतरच या पदधतीने पुढच कामं आपल्याला सुरू करता येईल.

अशा पद्धतीने आपल्या विद्यापीठाची पताका आपल्या देशाच्या बाहेर परदेशामध्ये रोवण्यासाठी आपण जी सुरूवात केली आहे त्यासाठी आपल्याला खुपच चांगला प्रतिसाद मिळाला आहे आणि युजीसीने, इतर काही शासनाच्या विद्यापीठांनी आणि विभागांनी याच्या बददल खुप कौतुकाची थाप आपल्याला दिलेली आहे, राज्यपालांनी पण आपल्या मास्टर प्लॅनच आणि फ्रेंड्स ऑफ मुंबई युनिर्व्हसिटीचे आणि परदेशामध्ये जी विद्यापीठाची शाखा सुरू करत आहोत त्याच कौतुक केलेल आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशी नुसार मा. कुलगुरू संजय देशमुख यांना कुलसचिवांनी विनंती केली की, खालील दोन ठराव अधिसभेपुढे मांडण्यात यावे आणि अधिसभेपुढे विचारार्थ ठेवण्यात यावे.

व्यवस्थापन परिषदेने सादर केलेल्या विविध वित्तिय विवरणाचा ज्यात सन १७-१८ या वर्षाचा अर्थसंकल्पिय अंदाज तसेच सन १६-१७ या वर्षासाठीचा सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज यांचा समावेश आहे याचा विचार अधिसभेने करावा अशी मी विनंती करतो; त्याचबरोबर वार्षिक वित्तिय विवरणामध्ये तपशिलवार दिलेले सन १७-१८ सालासाठीचे अर्थसंकल्पिय अंदाज तसेच सन १६-१७ सालासाठीचे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज विचारात घेऊन स्वीकृत आणि संमत करावे, अशी मा. कुलगुरूंनी सभागृहाला विनंती केली.

मुंबई विद्यापीठाच्या आजच्या या सिनेटसाठी उपस्थित सारे मान्यवर आता जे काही प्रारूप बजेट आमच्याकडे दिले फक्त मला हे समजवून घ्यायच आहे की या प्रारूप बजेटवरती आपल्या अधिसभेचे काय म्हणण असेल ते मांडण्याचा त्यांना अधिकार असावा असं मला वाटत; परंतु बजेटच आता आमच्या हातात मिळालेल आहे; आता वाचणार केंव्हा आणि याच्यावर मत मांडणार केंव्हा आणि ते आपल्याकडे येणार केंव्हा त्यामुळे या सर्व गोष्टींची यापुढे तरी काळजी घ्यावी की याच्यावर काही बोलायचे असेल तर ते आम्हाला विहित वेळेत मिळाल पाहिजे ते जर त्या वेळेत मिळाले तर त्याच्यावर आम्ही काहीतरी बघुन त्यावर सुचना देऊ शकतो. पण सुदैवाने ते आले आणि ते बघितले परंतु इतर ज्या अर्थसंकल्पिय तरतुदीं बददल जे सांगितले त्यामध्ये महत्वाची तरतुद इस्टीमेटेड कॉस्ट जी बनवली आहे त्याच्यामधून १०० कोटी रूपये यायचे आहेत शासनाकडून याच्याकडून आम्ही अपेक्षा केली की आमदार प्रतिनिधीं त्याच्या बाबतीमध्ये राज्य सरकारकडे पाठपुरवठा करून ते पैसे मिळवता येतात, आपले दोन विषय महत्वाचे आहेत ते १०० कोटी आणि ८० कोटी संलग्नित महाविद्यालयाकडून यायचे आहेत ते आता हे १०० कोटी ची तरतुद राज्य शासनाच्या बजेटमध्ये झाली पाहिजे, तर राज्य शासनाच बजेट आता परवा येत आहे त्याच्यामुळे जर बजेट तरतुद झाली नसेल तर मला माहित नाही काय होईल; परंतु आपल्याकडून या गोष्टीसाठी पाठपुरावा कोणी केलेला आहे आणि त्याच्यासाठी काय पत्रव्यवहार केला आहे आणि त्याच्यासाठी कोणी काय केले आहे हे जर आम्हाला बजेटच्या अगोदर जर कळल तर येणा-या बजेटमध्ये ज्यावेळेला या विषयावरती चर्चा होईल त्यावर आम्ही सर्व आमदार प्रतिनिधी, बाकीचे दोन प्रतिनिधी आहेत त्यांना बोलावून हे पैसे लवकरात लवकर मिळण्यासाठी आम्ही प्रयत्न जरूर करू, असे आश्वासन ॲड.अनिल परब यांनी दिले.

एकूण रक्कम २२७ कोटी आहे पण आम्ही या वर्षी १०० कोटी मिळावे अशी आशा व्यक्त करतो, असे यावर मा. कुलगुरू यांनी सांगितले.

अंदाजे कमीत-कमी १०० कोटी तरी मिळाले पाहिजेत ते १०० कोटी मिळण्यासाठी आता जे बजेट तयार झाले असेल त्याच्यामध्ये ती तरतुद झालेली असली पाहिजे तरच ते आपल्याला पैसे मिळतील, असे ॲड.अनिल परब यांनी सांगितले.

गेल्या आठवडयामध्ये याबदद्लचा मी औपचारिक पत्रव्यवहार पुन्हा एकदा केला त्याच्यामध्ये प्रवीण परदेसी सर आणि आपले ॲडीशनल चिफ सेक्रेटरी एज्युकेशन आणि मंत्री महोदय आणि मुख्यमंत्र्यांशी प्रत्यक्षात बोलणे झाले आणि त्यांनी आश्वासन दिले की, आपल्या बजेटमध्ये याचा उल्लेख असेल. आता त्या पत्राची प्रत आज संध्याकाळी देईन, असे मा. कुलगुरू यांनी आश्वासन दिले.

आज आम्हाला पत्राची प्रत देण्याची व्यवस्था करा; जर पाठपुरावा करायचा असेल तर तो एक होईल आणि जे ८० कोटी रूपये संलग्नित महाविद्यालयाकडून यायचे आहेत आता आपण जस सांगितल की आपली गंगाजळ फार मोठी होत चालली आहे जर अशापद्धतीने आपण पैश्यांच्या पाठी लागलो नाही जर त्यांच्यासाठी निश्चित/विविक्षित योजना जर बनवली नाही तर मला अस वाटत की प्रत्येक सिनेटमध्ये गंगाजळीवरतीच चर्चा होत राहील तर त्याच्या संदर्भात काहीतरी निर्णय घ्या, असे ॲड. अनिल परब यांनी मत मांडले.

व्यवस्थापन परिषदेची बैठक उशीरा झाल्यामुळे त्यांची संमती १४ मार्च, २०१६ ला आम्हाला संध्याकाळी मिळाली; त्यामुळे बजेट पाठवायला उशीर झाला याच्याबद्दल मी प्रशासनातर्फे दिलगिरी व्यक्त करतो मा. सदयस्यांना जे त्यामध्ये अंर्तभाव करायला वेळ मिळाला नाही याची पुढे दक्षता घेण्यात येईल याची मी खात्री देतो, असे कुलसचिवांनी आश्वासन दिले.

विद्यापीठाच्या बजेटमध्ये तूट दाखवणार आहेत जे आपले अनावर्ती खर्च आहेत तर त्या अनावर्ती खर्च मध्ये हे कपात करू शकतो का? वित्त व लेखा अधिकारी यांचे काय मत आहे? हा एक जो मुद्दा आहे; तो दोन प्रकारे करता येईल खर्च कमी करणे आणि दुसरा मुद्दा उत्पन्न वाढवणे. दहा वर्षामध्ये विद्यापीठाने शिक्षण शुल्क आहे ती अजुनही वाढवली नाही आणि दरवेळी आपण कोणत्या ना कोणत्या दबावाखाली येऊन तो प्रस्ताव आपण करत नाही त्यामुळे मला अस वाटत आवाक्याच्या बाहेर खर्च जात असेल तर विद्यापीठाने हा निर्णय घेणे अपरिहार्य आहे. विद्यापीठाने शिक्षण वाढवायला पाहिजे त्या दृष्टीने आपण पावले टाकायला पाहिजे, असे डॉ. अनिल कर्णिक यांनी मत मांडले.

सर, आपण दोन मुद्दे उपस्थित केले आवर्ती खर्चाबद्दल. आवर्ती खर्च निश्चितच कमीत-कमी करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील राहील. एक तरतुद केलेली आहे आपली अंतर्गत अर्थसंकल्प मांडणी आहे त्यामध्ये जास्तीत-जास्त बचत करून तो पैसा न वापरून पुढे आपल्याकडे ठेवी राहतील याचा आम्ही प्रयत्न करू; दुसरा मुद्दा विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क वाढलेले नाही, हा एक कळकळीचा मुद्दा आहे; मागील एक वर्षापासून आपल्याकडे प्राधिकरणे जी आहेत, ती पदसिद्ध अधिका-यांवरूनच असतात आपल्याकडे फक्त दोन लोकप्रतिनिधींकडून दोन नामनिर्देशित आमदारांच्या स्वरूपात अधिसभेवर आहेत परंतु बाकी आपल्याकडे लोकप्रतिनिधीं नाही आहेत म्हणून हा एक मोठा धोरणात्मक निर्णय होईल आणि त्यामुळे विविध विद्यार्थी संस्थाच्या चळवळीचा त्याला विरोध आहे की शिक्षण शुल्क वाढवू नका; हे एक कुठेतरी संतुलीत कार्य प्राधिकरणांना करायचे आहे. व्यवस्थापन परिषद आणि विद्वत परिषद आणि आम्ही वाट बघत आहोत; चार-सहा महिन्यात पुढे जी विद्वत परिषद येईल त्यावेळी प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवण्यात येईल ज्या विद्वत परिषदेमध्ये शिक्षक प्रातिनिधी, व्यवस्थापन प्रतिनिधी व विद्यार्थी प्रतिनिधी सगळे असतील त्यामध्ये काही प्रमाणात शिक्षण शुल्क वाढ करणे योग्य आहे की नाही त्यावर चर्चा करून निर्णय लवकर घेता येईल, परंतु ही बाब सगळीकडुनच विचारणा होत आहे की जास्त प्रमाणात जो पर्यंत शिक्षण शुल्क वाढणार नाही तोपर्यंत प्राध्यापकांना पैसे देऊ शकणार नाही, हा एक मुद्दा आहे आणि बहुतेक पुढच्या अधिसभेमध्ये हा मुद्दा येईल, अशी मला अपेक्षा आहे असे कुलसचिवांनी स्पष्टीकरण दिले.

साधारण शुल्काच्या रूपाने आपल्याला किती पैसे येतात? २०० कोटीच्या आसपास साधारण आपल्या बजेटच्या किती टक्के असतात? १/३ असतात आणि अपेक्षित किती आहे आपल्याला म्हणजे वाढवून तुम्ही किती अपेक्षित करता, असे डॉ. अनिल कर्णिक यांनी विचारले, व वित्त व लेखा अधिकारी यांनी उत्तर दिले.

आजपर्यंत फि तीच राहीलेली आहे, २००८ पासून फि एकच राहीलेली आहे आणि खर्च आपला वाढतच चाललेला आहे; त्यामुळे हा प्रोब्लेम होतो आणि त्यामुळे शासनाकडून अपेक्षा आहे की शासनाने वेतन थकबाकी दिली तर आम्हाला थोड सुसहय होईल, अशी माहिती यावर श्री. अशोक फळणीकर वित्त व लेखा अधिकारी यांनी दिली.

जेव्हा विद्यापीठाच्या दर्जाबद्दल बोलतो त्यावेळी हारवर्ड आणि ऑक्सफर्डसारख्या विद्यापीठांची उदाहरणे देतो; पण तीकडे जी एका कोर्सची जी फि असते ती २० लाखाच्या आसपास असते आणि आपण विद्यापीठामध्ये दरवर्षी १० ते २० लाख एवढीच फि घेतो; ही जी प्रचंड तफावत आहे ती शेवटी कुठेना-कुठे पायाभुत सुविधा, चांगल्या प्रकारचा कर्मचारी वर्ग घेणे, ही जी आहे, इथे पैशांचा निधी कमी पडतो; हया ज्या बाबी आहेत त्या समाजापुढे ठेवायला पाहिजेत आणि आपण समाजाच्या दबावामुळे गेली १० वर्षे शुल्क वाढवत नाही आणि त्याच्यामुळे आपला दर्जा खालावत जातो. दर्जा खालावत जाण्याच मुख्य कारण असत अपुरे मनुष्य बळ आणि दुसरे कारण की साधनसामुग्री; आपल्याकडे इमारती नाहीत, प्रयोगशाळा नाहीत, हया गोष्टी जोपर्यंत आपण सुधारत नाही तोपर्यंत दर्जा आपला वाढणार नाही, त्यामुळे हे जे मुद्दे आहेत समाजापुढे ठेवायला पाहिजे आणि ३५ टक्के शुल्क वाढ जोपर्यंत करत नाही तो पर्यंत आपला डेफिसिट आहे; तो डेफिसिट शासनाच्या मर्यादा आहेत पण दरवेळी आपण अपेक्षा करतो की, शासनाने १०० कोटी रूपये दयावे १५० रूपये कोटी दयावे तर हे प्रत्येकवेळी शासनाला शक्य होईलच असे नाही तर विद्यापीठाने हे कुठेतरी बघायला पाहिजे की उत्पन्न कसे वाढवता येईल, तो उत्पन्नचा मुख्य स्त्रोत विद्यापीठ जे गोष्टी विकतात ते म्हणजे ज्ञान इथे ज्ञान विकण्यासाठी लागणारा पैसा आहे; ते जर आपण समाजाकडे मागितले तर मला वाटत याच्यामध्ये गैर अस काहीच नाही आहे; तर आपण या बाबतीत विचार करायला पाहिजे, असे डॉ. अनिल कर्णिक म्हणाले.

समजा विद्यापीठातील अर्ध्याहून जास्त पदे रिक्त आहेत; आपल्याकडे जे नॉन-टिचिंग स्टाफ आहे, नॉन-टिचिंग स्टाफची पदे सुद्धा रिक्त आहेत आणि ब-याचश्या जनरल फंडमधून पगार दयावा लागतो. फि स्ट्रक्चरमध्ये कमीत-कमी २० हजार रूपये फि आहे आणि जी २० लाख रूपये शुल्क आहे एवढा फरक आहे २० हजार रूपये फि आहे; आपल्या एखादया कोर्सची तीकडे एक वर्षाचा व दोन वर्षाचा जी फि आहे साधारण २० लाख रूपये आहे. ही जी प्रचंड तफावत आहे ती कुठेतरी आपल्या दर्जावर परिणाम करत असते आणि हा समाज नेहमी आपल्याला विचारतो की सगळयांचा हाच प्रोब्लेम आहे. गेली दहा वर्षे झाली शाळेमध्ये सुद्धा दरवर्षी १० टक्के शुल्क वाढवतो आणि विद्यापीठामध्ये गेली १० वर्षे आपल्याला १ रू. पण वाढवुन दिलेला नाही; कॉलेजेसची परिस्थिती खुप वाईट आहे, अशी मा. कुलगुरू यांनी माहिती दिली.

आपण २००८ पासून शुल्क वाढवलेली नाही. माझे असे मत आहे की, सगळयांना एकदा बोलावून विद्यापीठ, संस्था याच्याशी संबंधित जेवढे लोक आहेत, एक आपले असे धोरण झाले पाहिजे ज्याच्यावर दरवर्षी चर्चा न होता ठराविक वर्षानंतर एवढी फी वाढली पाहिजे, असा ठराव एका वेळेलाच झाला पाहिजे; आपण प्रत्येक वेळेला जर वाढ करायला गेलो त्याच्यावर प्रत्येक वेळेला विरोध होणार आहे एकदा तुमचे धोरण ठरले पाहिजे १० टक्के असेल, १५ टक्के असेल, दर तीन वर्षांनी १५ टक्के वाढवायची असेल आज जर दर तीन वर्षांनी १५ टक्के असती तर, एकदमच जर ३५ टक्के वाढवायला तुम्ही जाल तर तुम्हाला विरोध तर होणारच आहे; पण तुम्ही धोरण जर ठरवले तीन वर्षांनंतर एवढे टक्के वाढले पाहिजे; मला अस वाटत नाही की, त्याच्यामध्ये फार मोठा विरोध होईल पण तुम्ही पाच-पाच, सात-सात वर्षात एकदम ३५ टक्के वाढवायला जाल आणि तुट भरून काढायला जाल तर १०० टक्के विरोध होणार आहे; म्हणून माझ असं मत आहे एक निर्णय घ्यावा; एकदा हया कुठल्या सिनेटनंतर एकदा याच्याशी संबंधीत लोक आहे या सगळया लोकांची एकदा संमती घ्यावी आणि एक धोरण ठरवावे की, याप्रमाणे शिक्षण शुल्कात वाढ होईल; मग ती वर्षाची असेल; तीन वर्षाची असेल; पाच वर्षाची असेल; जशी सगळयांच्या सोयीची त्याच्याप्रमाणे होईल ते जर एकदा ठरल तर मला वाटत नाही की दरवर्षी किंवा पाच-सात वर्षांनी तुम्हाला एकदम शिक्षण शुल्क वाढवण्याचा प्रयत्न करताना अडचण येईल, असे डॉ. अनिल कर्णिक यांनी मत मांडले.

याच्यामध्ये सभागृहाला एकच माहिती दयायची आहे ती म्हणजे जेंव्हा १० वर्षापूर्वी आपण एक समिती नेमली होती. समितीने जो निर्णय दिला होता तो १० टक्के वाढीचाच दिला होता. त्यावेळेला पण सातत्याने दरवर्षी आपण प्रस्तावीत करत होतो; एखादी विद्यार्थी संघटनाच म्हणा इतर जे उच्च शिक्षणातील घटक आहेत त्यांच्या संमतीमुळे आपल्याला एकदाही वाढ करता आली नाही म्हणून ती एकदम आपण प्रस्तावीत करतो तेंव्हा ती ३५ टक्के दिसते त्याच मुळ कारण त्याच्यामध्ये आहे, असे मा. कुलगुरूंनी सांगितले.

या वर्षी आपल्याला ऑनलाईन स्क्रिन ऑनस्क्रिन करेक्शनसाठी प्रस्ताव दिलेला आहे. त्यासाठी आपल्या १९.५ लाख उत्तरपत्रिका दर सेमिस्टरला स्कॅन करून त्याच्यामाध्यमातून आपण ऑनलाईन स्क्रिनींग आणि करेक्शन करणार आहोत. त्यासाठी जो खर्च प्रस्तावीत आहे त्याच्या तुलनेमध्ये जे शिक्षण शुल्क घेतो; परिक्षेची शुल्क ५०० रू. ते खुपच कमी आहे. असे नाही की विद्यापीठ जो खर्च दरवर्षी करणार आहे त्या अनुषंगाने तेवढे शिक्षण शुल्क घ्यावे; परंतु आपल्याला सुधारीत शिक्षण शुल्क जे आधीच मान्य झालेले आहे, हा खर्च प्रस्तावित होण्याच्या आधी ते आपण या सेमिस्टरपासून लागू करत नाही आहोत; परंतु सिनेटची आपल्याला मान्यता अशासाठी लागेल की नवीन अधिनियमामध्ये स्टॅटुट्सच्या माध्यमातून ही शिक्षण शुल्क वाढ आपण करू शकतो; फक्त परीक्षेचे शुल्क म्हणतो; एकुणच शुल्क वाढीसाठी आपण जे म्हणालात ती अतिशय योग्य सुचना आहे; त्या सुचनेनुसार आपण जी नवीन प्राधिकरणे अस्तित्वात येतील त्यांच्याबरोबर विद्यार्थी संघटना म्हणा विद्यार्थी, पालक त्यांची एक संयुक्त समिती स्थापन करून ज्याची तरतुद आपल्या अधिनियमामध्ये आहे आणि शिक्षण शुल्क वाढीसाठी आपण त्या समितीची स्थापना करून सिनेटच्या सन्माननीय सदयस्यांबरोबर ती एक बैठक

घेऊन एकुणच शिक्षण शुल्क वाढीचा प्रस्ताव त्यावेळाला आपण नक्की ठरवू; परंतु आता जो एक प्रस्ताव मांडत आहोत तो परिक्षेच शुल्क आणि शिक्षकांच मानधन, पण आपण आज ३ रू. आणि ५ रू. अस एक एक उत्तरपत्रिकेला मानधन देतो; २० रू. ते मानधन फक्त आपण वाढवतो ते विद्यापीठाच्या अंगावर खर्च येणार आहे त्याचा आपल्याला विद्यार्थ्यांकडुन कुठल्याही वसूलीची अपेक्षा नाही पण तो माफक जी वैध वाढ अपेक्षित आहे ती वाढ या सेमिस्टर पासून उत्तरपत्रिका तपासायला आपले शिक्षक येतील त्यांना देणार आहोत. विद्यार्थ्यांनाकडुन आधिच परिक्षेचे शुल्क घेतलेले असल्यामुळे म्हणून या सेमिस्टरला आपण शुल्क वाढ करत नाही आहोत, परिक्षेचे शुल्क ती फक्त ऑक्टोबरपासून आपल्याला अधिसभेच अॅप्रूव्हल लागेल जेणेकरून आम्ही स्टॅटयुट तयार करू ते स्टॅटयुट राज्यपालांकडे अॅप्रूव्हलला जातील आणि लगेच ते पारीत होतील पण या साठीची पूर्व तयारी म्हणून ती वाढ ऑक्टोबरमध्ये लागू करायची आहे आणि जी आता एप्रिलपासून शिक्षकांना मानधन म्हणून वाढ केलेली आहे त्या दोनबद्दल मला अधिसभेची मान्यता लागेल असे मा. कुलगुरूंनी सांगितले.

परीक्षा शुल्काबद्दल नाही आपण हा जो मुद्दा प्रवेश शुल्का बद्दल बोललो तर मुळात आपण बघतो परदेशात जी विद्यापीठे असतात ती इथे येत आहेत आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना त्यांच्या विद्यापीठात निमंत्रण करण्यासाठी; तसे ऑक्सफर्ड, केंम्ब्रिज आणि इतर विद्यापीठ भारतीय विद्यार्थ्यांना आणि इतर परदेशी विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क जे आकारले जाते, ते जे विद्यार्थी त्याच विद्यापीठाचे असतील त्याच्यापेक्षा वेगळया विद्यापीठातील विद्यार्थ्यांची काही टक्कयांनी जास्त असते तर हे आपण पुढे विचार करू शकतो जे परदेशी विद्यार्थी आपल्या विद्यापीठात येणार आहे तर त्यांच्यासाठी आपण तशी तरतुद करू शकतो. ज्याच्यामुळे शिक्षण शुल्क जास्त आपल्याला मिळेल कारण सगळीकडे आपल्याला तसे चित्र दिसत आहे, असे डॉ. मंजिरी कामत यांनी सूचना केली.

परीक्षेचे मानधन आणि परीक्षा शुल्क वाढीबद्दल समितीने जो अहवाल दिलेला आहे त्या वाढ करण्यासाठी स्टॅटयुट 483(A) आणि 483(B) सुधारणा करण्यासाठी अधिसभेत ठेवण्यात आला व याबाबत खालील ठराव पारित झाला.

"It is resolved to repeal the Statue 483-A ( Scales of Remuneration toPaper-Setters / Exminers etc.,) & Statue 483-B (Scale of Remuneration And schedule of appointments of chief Conductors/ Supevisors , Peons andOther Staff for theory Examinations , Labolratory, Supervisors, Experts and Other Staff for Practical, Oral, Term work Examinations and Cost of Materials supplied by the Colleges for Practical Examinations.)

It is further resolved to send the proposal to Hon'ble Chancellor for his assent as required by provisions of Sub-Section 4 of Section 72 of Maharashtra Public Universities Act, 2016."

माननीय कुलगुरूंनी मांडलेल्या २०१७- २०१८ या वित्तीय वर्षासाठी विद्यापीठाचा अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०१६- २०१७ वर्षाकरिता सादर केलेला सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

माननीय सदस्यांनी जी शुल्कवाढीच्या बद्दल मोलाच्या सुचना केलेल्या आहेत त्याची अधिसभेने दखल घेतली आणि सर्व शिक्षण क्षेत्रातील घटकांना उदा. विद्यार्थी, पालक, यांना व्यवस्थापनातर्फे बोलावून त्यांच्या दर तीन वर्षांनी किंवा दोन वर्षांनी, एक ठराविक टक्क्यांनी शुल्क वाढवण्याच्या सुत्रावर काम करून चांगल्या पद्धतीने एकदाच सुरूवातीला जरी १० टक्के, वाढले तर प्रत्येक दोन वर्षाला १० टक्के ५ टक्के, असे सांगून त्या बद्दल कुलसचिवांनी सभासदांचे आभार मानले.

मा. कुलगुरूंनी अधिसभेच्या सर्व सदस्यांचे अतिशय मनापासून आभार मानले आणि विद्यापीठाच्या १६० वर्षाच्या कारकिर्दीमध्ये अधिसभेचे जे योगदान आहे त्याबद्दल पुन्हा एकदा कृतज्ञता व्यक्त करून त्याचबरोबर विद्यापीठाच्या गेल्या वीस-एकवीस महिन्यांच्या वाटचालीमध्ये विशेषत: विद्यापीठ कायदा अस्तित्वात नसताना अधिसभेने ज्या पद्धतीने विद्यापीठाला मार्गदर्शन केले आणि कायदयामधील तरतुदीनुसार कायदा अस्तित्वात नसताना विद्यापीठाला योग्य मार्गाने आपली भुमिका पार पाडण्यासाठी जे मार्गदर्शन केल त्याबद्दल पुन्हा एकदा सर्व अधिसभा सदस्यांच मनापासुन आभार मानले.

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे व सहकार्याचे आभार मानून सभा संपल्याचे कुलगुरूंनी जाहिर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

मुंबई ४०० ०३२.
११ सप्टेंबर, २०१७